# उमरेड तालुक्यातील मिरची पिकाच्या उत्पादनाचे स्वरूप

डॉ. आशा तुकारामजी बानकर, सहा. प्राध्यापक, अर्थशास्त्र, स्व. गोविंदराव वंजारी शिक्षण महाविद्यालय, बुटीबोरी, नागपूर.

**प्रास्ताविक :**

कोणत्याही प्रदेशात भौतीक, आर्थिक सामाजिक परीस्थितीला अनुसरून विशिष्ट पिकांचे स्वरूप ठरवित असतात. काळानूसार त्यात परिवर्तन होत असते. भौतिक परिस्थितीत बदल सहज होत नाही. त्यामुळे आर्थिक व सामाजिक बदलांचा प्रभाव जास्त असतो. मिरचीचा समावेश मसालाच्या पिकात होत असून मानवी आहारात तिचे महत्वाचे स्थान आहे. मिरचीमध्ये अ आणि ब जीवनसत्व भरपूर प्रमाणात असतात. इतर कोणत्याही मसाल्यापेक्षा मिरचीचा वापर मोठया प्रमाणावर केला जातो. भारतात मिरचीचा प्रसार 17 व्या शतकात पोर्तुगीजांनी केला. तेव्हापासून अगदी झपाटयाने मिरचीची लागवड भारतभर होत आहे. मिरची उत्पादन व निर्यातीत भारताचा पहिला क्रमांक लागतो.

महाराष्ट्रात मिरचीची लागवड साधारणपणे एक लाख ते दिड लाख हेक्टर क्षेत्रात केली जाते. महाराष्ट्रातील मिरची खालील एकूण क्षेत्रफळापैकी 75 क्षेत्र जळगाव, धुळे, सोलापूर, नागपूर, नांदेड, कोल्हापूर, अमरावती, चंद्रपूर आणि उस्मानाबाद जिल्हयातच आहे. गेल्या 15 ते 20 वर्षात मिरची लागवडीखालील क्षेत्रात जरी फारशी वाढ झालेली नसली तरी उत्पादकता निश्चितपणे वाढलेली आहे.

मिरची पिकाला लागणारी आदर्श भौगोलिक परिस्थिती नागपूर जिल्हयात आढळून येते. तसेच मिरची पिक हे रोख (नगदी) पिक असूनही नागपूर जिल्हयाच्यापिकांमध्ये मिरची हे पिक गौण स्वरूपाचे दिसून येते परंतू नागपूर जिल्हयातील उमरेड, भिवापूर, कूही या तालुक्यातील मिरची पिकाखालील क्षेत्र मोठया प्रमाणावर दिसून येते. त्यामुळे उमरेड तालुक्यातील विविध पिकांमध्ये मिरची पिकाला अनन्य साधारण महत्व प्राप्त झाले आहे.

**मिरची पिकांचे महत्व** : उमरेड तालुक्यातील वातावरण हे मिरची पिकाला अनुकूल आहे. त्यामुळे उमरेडमध्ये मिरची पिकाचे उत्पादन वर्षातून दोनदा घेतले जाते. वातावरणाच्या अनुकूलामुळे मिरचीची झाडे चांगली वाढतात व मिरचीही भरघोष लागते. अर्थात मिरची पिकाला अनुकूल असलेल्या वातावरणामुळे उमरेड तालुक्यामध्ये मिरची उत्पादन घेतल्या जाते. आपल्या भारताच्या निर्यातीत मिरची पिकाला जास्त महत्त्व आहे. कारण उमरेडमध्यील मिरची ही महाराष्ट्राच्या बाहेर जास्त प्रमाणात जाते. व्यापारी वर्ग हे उत्पादन भारताबाहेर पाठवितात, भिवापूर, मांढळ, आणि नागपूर मधील कळमना मार्केट या बाजारपेठापेक्षा उमरेडमधील मिरचीला बाहेरून येणारी व्यापारी मोठया प्रमाणावर खरेदी करतात. उमरेड बाजारापेठत मोठया प्रमाणावर व्यापारी वर्गाला मिरची विकल्या जाते.

**उमरेड तालुक्याची भौगोलिक पार्श्वभूमी** : कोणत्याही भूभागाचा किंवा प्रदेशाचा अभ्यास करण्यासाठी त्या भागाची किंवा प्रदेशाची माहिती असणे आवश्यक आहे. कारण त्या प्रदेशाचे स्थान विस्तार तापमान पर्जन्यमान, भूपृष्ठरचना, जमिन, प्रवाहप्रणाली, हवामान इ. विषयी माहिती घेवून त्यावर अभ्यास करणे सोपे जाते. हया आधारे उमरेड तालुक्याची ओळख होते.

**उमरेड तालुक्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी :** नागपूर जिल्हयातील उमरेड हे तालुक्याचे मुख्य ठिकाण असून कापड उदयोगासाठी प्रसिध्द आहे. उमरेड तालुक्यात अधिक पाऊस पडत असल्यामुळे तेथे जास्त वने आहेत. या वनात विविध प्रकारची झाडे, फुलझाडे ही आहेत. येथे दगडी कोळशाच्या खाणी ही आहेत. येथे तलाव सुध्दा आहेत. येथे धानाचे पिकही घेतले जाते. तसेच गहू, ज्वारी, भाजीपालयाचे उत्पादन ही

घेतल्या जाते. येथे मिरचीची पिक मोठया प्रमाणावर घेतले जाते. येथे विटा व कौले तयार करण्याचा उदयोग, व्यवसाय चालतात. येथे धानाच्या गिरण्याही आहेत..

**उमरेड तालुक्याची सांस्कृतिक पार्श्वभूमी** : उमरेड तालुक्यातील लोक धार्मिक दृष्टीचे आहेत. परंपरागत सण, यात्रा, लग्न वर्षभरातील संपूर्ण सणे मोठया उत्साहाने साजरे करतात. सामाजिक मेळाव्यातून लग्न इ. धार्मिक, सांस्कृतिक कार्य केली जातात. तसेच विविध प्रकारच्या शैक्षणिक संस्था येथे आहेत. येथील लोक मुलांना विविध शैक्षणिक सोयी उपलब्ध करून उच्च शिक्षणाला मुलांना पाठवितात. येथील लोक जागरूक आहेत, त्यांना शिक्षणाचे महत्व समजलेले आहे. येथील जनता जून्या रूढी, परंपरामध्ये गुरफटलेली नाहीत. त्यांची विचार करण्याची क्षमता ही चांगली आहे. त्यामुळे मुलांना ते शिक्षणाच्या चांगल्या संधी उपलब्ध करून देतात.

**मिरची पिकावरील किड व रोग :** विदर्भातील सर्व मिरची पिकविण्याच्या प्रमूख क्षेत्रामध्ये बडबोअर किडीचा प्रार्दुभाव झालेला दिसून आलेला आहे. ही किड खालील नावांनी ओळखल्या जाते.

1) युरीटोमा स्पेसीज 2) सिरेटोन्युरा इन्डो 3) गोईथेला स्पेसीज

युरोटोमा स्पेसीज या किडीच्या अजया मिरचीचे पिक फुलोन्यावर असतांना कळीत तेसथ अगदी लहान व कोवळया फळात आढळून येतात. त्यामुळे फळांची वाद खुंटते मिरचीचे फळे लांबोळे न वाढता गोलाकार व बोथट आकार घेते. काही काळया आवरणात काळातच कोषावस्थेत जाते. सिरोटोन्युरा इन्डो व गोईथेला स्पेसीज या किडीच्या अळया फुलात तसेच फळात दिसून येतात. अळया कडीच्या तसेच फाळाच्या आतील भाग पूर्णपणे खाऊन टाकतात. त्यामुळे फळे गाठी सारखे दिसतात. कालांतराने गाठी काळया पडतात सडतात व गळून पडतात. मिरची पिकावर मूळकूज या रोगाचा प्रसार रोगट बियांव्दारे होतो तर शेंडेमर या रोगाचा प्रसार हवेव्दारे होतो. चुरडा - भूरडा या रोगाची लागण किटकाव्दारे होते. भूरी नावाचा रोग हवेव्दारे होते तर चिकटा या रोगाचा सुध्दा प्रादुर्भाव होतो.

**मिरची पिकावर परिणाम करणारे घटक** : कोणत्याही ठिकाणाची शेती ही त्या प्रदेशातील निरनिराळया घटकांवर अवलंबून असते व त्यानुसार तेथील उत्पादन अवलंबन असते. शेतीवर परिणाम करणा-या घटकात भौगोलिक व सामाजिक - सांस्कृतिक घटकाचा समावेश होतो.

1) भौगोलिक घटक - शेती उत्पादनावर परिणाम करणान्या घटकात भौगोलिक घटक फार महत्वाचे आहेत. कारण या घटकाचा शेतीवर जास्त प्रभाव पडतो. भौगोलिक घटकातभपष्ठरचना. हवामान, तापमान पर्जन्यमान, मृदा या तीन घटकांचा प्रामुख्याने समावेश होतो.

2) सामाजिक - सांस्कृतिक घटक- शेतीवर परिणाम करणाऱ्या समाजिक - सांस्कृतिक घटकात लोकसंख्या वाहतूक व दळणवळणाची साधने, जलसिंचन, जलसंपत्ती व पिक उत्पादन बाजारपेठ यांत्रिकीरण व तांत्रिक ज्ञान, भांडवल शेतजमीनीची मालकी व शेताचा आकार मजर रासायनिक खते व जैविक घटक जीवनमान व रूढी-परंपरा, शासकीय धोरण इ. यांचा कृषीवर प्रभाव पडत असल्याचे आढळून येते.

**निष्कर्ष :**

1. मिरची या पिकासाठी आवश्यक असणारी भौगोलिक परिस्थिती उमरेड तालुक्यात दिसून येते. यामध्ये मिरची पिकासाठी आवश्यक असलेले पर्जन्य तापमान व मृदा हे मिरची पिकासाठी अनुकूल आहे.
2. कोणत्याही पिकांची उत्पादनात वाढ होण्यासाठी मृदा हा घटक सर्वात महत्वाचा असतो. मिरची या पिकासाठी आवश्यक असलेली तांबडी लोभयुक्त मृदा तसेच मध्यम काळी मृदा उमरेड तालुक्यात दिसून येते.

3. मिरची पिकासाठी बाजारपेठेचे आवश्यकता असते. उमरेड, भिवापूर आणि मांढळ या ठिकाणी स्थानिक बाजारपेठ तसेव नागपूरला कळमना या ठिकाणी मोठी बाजारपेठ आहे. यामुळे शेतक-यांना माल विकण्यास मदत होते.
4. नागपूर जिल्हयातील मिरची पिकाचा विचार केल्यास मिरचीचे पिक हे गौण स्वरूपाचे दिसून येते. परंतू उमरेड तालुक्यात मिरची हे पिक महत्वाचे पिक म्हणून दिसून येते.
5. मिरची हे पिक राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय दर्जाचे असल्यामुळे त्यानुसार नागपूर जिल्हयातून देशाच्या चारही दिशांकडे जाणारे राष्ट्रीय महामार्ग तसेच लोहमार्गांचे जाळे दिसून येते.
6. मिरची हे रोख पिक म्हणून ओळखल्या जाते.
7. सुरवातीला मिरची पिकाचे क्षेत्र कमी होते. नंतर मात्र त्यात हळूहळू वाढ होत गेलेली दिसून येते त्याचप्रकारचा बदल मिरची पिकाच्या बाजारभावात होत असलेला दिसून येतो.

**संदर्भ सूची:**


1. आगलावे प्रदीप, "संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर-2000
2. घारपूरे विठ्ठल, "कृषी भूगोल, पिंपळापूरे अँड कं. पब्लिशर्स, नागपूर-2000
3. घाटोळे रा.ना."समाजशास्त्रीय संशोधन तत्वे व पध्दती"ए मंगेश प्रकाशन, नागपूर-1990
4. फुले सुरेश, ' कृषी भूगोल", विद्याभारती प्रकाशन, लातूर, -1999
5. ढाके, पाटील, भारंबे, 'कृषी भूगोल, प्रशांत पब्लीकेशन, जळगाव-2004
6. कृषी उत्पन्न बाजार समिती, उमरेड, जि. नागपूर
7. पंचायत समिती, उमरेड, जि. नागपूर.
8. सामाजिक - आर्थिक समालोचन, नागपूर,
9. तहसील कार्यालय, उमरेड, जि. नागपूर
10. कृषि विभाग, उमरेड, जि. नागपर
11. मुळे रा. श. आणि उमाठे वि.तु, 'शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे महाराष्ट्र ग्रंथ मिर्मिती
12. मंडळ, नागपूर-1987
13. भितांडे वि.रा. शैक्षणिक संशोधन पध्दती, नूतन प्रकाशन , पूणे- 1994